**मे. सोपानराव बाळकृष्ण धसाळ ॲग्रो प्रोडक्ट्स लिमिटेड, गट नं. २२३, मु.पो. — माळकुप, तालुका- पारनेर, जिल्हा — अहमदनगर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित मळीवर आधारित ६०.० किलो लिटर/प्रति दिन क्षमतेच्या आसवणी प्रकल्प उभारणीसाठी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत्त.**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. सोपानराव बाळकृष्ण धसाळ ॲग्रो प्रोडक्ट्स लिमिटेड, गट नं.२२३, मु. पो. माळकुप, तालुका- पारनेर, जिल्हा — अहमदनगर, महाराष्ट्र यांच्या नविन प्रस्तावित मळीवर आधारित ६०.० किलो लिटर / प्रति दिन क्षमतेचा आसवणी प्रकल्प उभारणीसाठी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बुधवार दिनांक १० फेब्रुवारी, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थळावर आयोजित करण्यात आली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ०७/२०२०, व पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी २०१२१५-एफ.टी.एस.-०२४१, दिनांक १५/१२/२०२० अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठन करण्यात आली :-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक<br>(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी) | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी - अहमदनगर<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>अहमदनगर | - | **संयोजक** |

श्री संजीव रेदासनी, प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, अहमदनगर तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना कोविडच्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना केली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक यांनी असे नमुद केले की, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्पाच्या परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे. संयोजक यांनी सदर पर्यावरण विषयक जनसुनावणी घेणेकरीता मंडळाने अवलंबिलेल्या प्रणालीची माहिती दिली.

आयोजक यांनी सांगितले की वरिल प्रस्तावित प्रकल्पाबाबत उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, अहमदनगर यांचेकडे एकही सूचना/तक्रार नोंदविण्यात आलेली नाही, तथापि दोन पाठिंबा दर्शविणारे निवेदन प्राप्त झालेले आहे. आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहिती व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना याबाबत माहिती दिली.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात आलेः-

<u>खालील व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक / पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी माहिती दिली.</u>

१) <u>श्री रावसाहेब काशीनाथ भांड, राहणार-धोत्रे बुद्रुक, तालुका- पारनेर, जिल्हा -अहमदनगरः-</u>

स्थानिकांना या प्रकल्पाचा फायदा काय व रोजगार किती उपलब्ध होऊ शकतो?

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की त्यांचा प्रश्न रास्त असून त्यांना प्रकल्पापासून काय फायदा होईल याचे उत्तर देण्यात यावे.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे या प्रकल्पात ७७ व्यक्तींना प्रत्यक्ष रोजगाराची संधि मिळणार आहे. कारखाना व्यवस्थापनानेचे धोरण आहे की स्थानिक युवकांनाच प्राधान्य देण्यात येईल. हा मळीवर आधारित प्रकल्प असून प्रकल्पास कच्चा माल हा ऊस लागणार आहे. त्यामुळे परिसरातील ऊस उत्पादक शेतात काम करणा-या

कामगारांनाही याचा फायदा होईल. त्याच्यांही रोजगारात वाढ होईल. परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड वाढ होईल. वाहतुकीसाठी वाहने लागतील. त्यामुळे वाहनचालकांना नोक-या मिळतील. लहान हॉटेल्स, छोटेमोठे उद्योगात प्रचंड वाढ होईल. त्यामुळे अप्रत्यक्ष रोजगारात प्रचंड वाढ होईल. त्यामुळे त्यांच्यावर अवलंबून असणा-या कुटुंबातील व्यक्तींना त्याचा फायदा होईल.

२) <u>श्री माणिक रानबा भोंडवे, राहणार-ढवळपुरी भोंडवेवस्ती, तालुका-पारनेर, जिल्हा-अहमदनगरः-</u>

सदरहू प्रकल्प उभारताना शेतक-यांना त्रास होऊ नये. आपण पाईपलाईन टाकली. तेथे चर आहे. पावसामुळे तेथे ओढा पडला आणि मोठे दगड पडलेले आहेत. त्यामुळे वाहतुकीस अडथळा होतो. त्याची काळजी घ्यावी. बैठकीत जरी आश्वासन दिलेले असले तरी काळजी घ्यावी. स्थानिकांना त्रास होऊ नये. आम्ही भाजीपाला पिकवतो. ग्राहक प्रथम कुठला भाजीपाला आहे असे विचारतात. नगरचा भाजीपाला घेत नाहित. कारण तेथे कारखाने आहेत. तरी जरी प्रकल्पाचा स्थानिकांना फायदा होणार आहे, तरीही प्रदूषण न होण्याची काळजी घ्यावी.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रश्न अगदी योग्य प्रकारे मांडल्याचे मत व्यक्त केले व प्रकल्प सल्लागार यांना सूचना की प्रकल्पात उत्पन्न होणा-या सांडपाण्यावर करण्यात येणा-या प्रक्रियेबाबत माहिती द्यावी. त्याचप्रमाणे प्रकल्प ऊभारणासाठी जे खोदकाम केलेले आहे, तेथील दगड त्वरित दूर करण्यात यावेत.

येथे अध्यक्षांनी उपस्थितांसमोर सूचना केली की खोदकाम करताना जे काही दगड काढलेले असतील, ते दोन दिवसात बाजूला करण्यात यावेत, जेणेकरुन गावक-यांना जाता-येता त्रास होऊ नये. अध्यक्षांनी सदरहू बाब इतिवृतांत घेण्याची सूचना केली व याबाबत प्रकल्प प्रवर्तकांना माहिती देण्याचे आदेश दिले.

प्रकल्प प्रवर्तकांनी प्रथम श्री भोंडवे यांनी प्रकल्पास पाठिंबा दिल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. त्यांनी आश्वासन दिले की उद्याच्या उद्या किंवा आजच वाहतुकीतील अडथळा आणणारे दगड बाजूला करण्यात येतील. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रकल्पात उत्पन्न होणारे सांडपाण्यावर प्रक्रिया कशी करण्यात येईल व त्याचा पुनर्वापर कसा करण्यात येईल याची सर्व माहिती

सादरीकरणात सादर करण्यात आलेली आहे. सदरहू प्रकल्पामुळे परिसरातील नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही याची ग्वाही त्यांनी दिली.

३) **डॉ. पी. एम. जोशी, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नाशिक तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती :-**

डॉ. पी. एम. जोशी यांनी सांगितले की जरी प्रकल्पात प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येते, तरीही ती व्यवस्थित चालविण्याची काळजी घेण्यात यावी. त्या सयंत्रणेची वेळोवेळी काळजी व देखभाल (Operation & Maintenance) करण्यात यावी. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी याबाबत वेळोवेळी पाहणी करत असतात व त्यात काही त्रुटी आढळल्यास त्यावर पर्यावरण कायद्यांतर्गत पुढील कारवाई करण्यात येते.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी येथे माहिती दिली की प्रकल्पात सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे प्रकल्पात ऑन लाईन मॉनिटरिंग व्यवस्था कार्यान्वित करण्यात येणार आहे. सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की जरी भारत सरकारने टीओआरमध्ये जल प्रदूषणासाठी ऑन लाईन मॉनिटरिंग व्यवस्था व हवा प्रदूषणासाठी स्टॅक मॉनिटरिंग व्यवस्था (२४ X ७) कार्यान्वित करण्याचे निर्देश दिलेले असूनही पर्यावरण सल्लागार यांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व सादरीकरणात त्याचा उल्लेख केलेला नाही, तो करण्यात यावा.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी विचारणा केली की जर आपण शास्त्रीय अभ्यास केलेला आहे, तर आपण दाखविलेल्या विंडरोझच्या दिशांनुसार प्रकल्पामुळे कुठल्या गावांकडे प्रदूषके जातील व त्यामुळे प्रदूषणाचा त्रास कुठल्या गावांना होऊ शकतो या निष्कर्षाचा उल्लेख अहवालात नाही. तरी कुठल्या गावांवर प्रदूषकांचा आघात होऊ शकतो, त्याची सर्व माहिती उपस्थितांना देण्यात यावी.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की कोळसा व स्पेंट वॉश यांचे ज्वलन होऊन जो काही एसपीएम (सस्पेंडेट पार्टिक्युलेट मॅटर) व सल्फय-डाय-ऑक्साईड ही प्रदूषकांची वाढ ही माळकोप येथे होईल, त्यात धुलीकणाची म्हणजे एसपीएमची मात्रा ही ०.३ मायक्रोग्रॅम प्रति एनएमक्युब म्हणजे अत्यल्प व सल्फय-डाय-ऑक्साईडची मात्रा फक्त १.० मायक्रोग्रॅम प्रति एनएमक्युब अशी राहिल.

आता तेथील धुलीकणाचे प्रमाण हे ६४.५ मिली मायक्रोग्रॅम प्रति एमक्युब, तर सल्फय-डाय-ऑक्साईडचे प्रमाण हे २७.३ मायक्रोग्रॅम प्रति एनएमक्युब अशी आहे. म्हणजे आताची पातळी व संभाव्य वाढ यांची बेरीज केली, तर धुलीकणांची पातळी ही ६४.८ होईल. ती राष्ट्रीय गुणवत्ता मानकांपेक्षा (१०० मायक्रोग्रॅम प्रति एनएमक्युब) खूपच कमी आहे. त्यामुळे धुलीकणांचा कुठलाही धोका परिसरातील वनस्पती, पशूपक्षी व माणसांवर होणार नाही.

त्याचप्रमाणे सल्फय-डाय-ऑक्साईडची आताची पातळी व संभाव्य वाढ यांची बेरीज केली, तर ती २८.३ होते. ती राष्ट्रीय मानकांपेक्षा (८० मायक्रोग्रॅम प्रति एनएमक्युब) खूपच कमी आहे. ती खूपच नाममात्र आहे त्यामुळे त्याचाही सार्वजनिक जीवनावर परिणाम होणार नाही.

४) <u>श्री संजीव रेदासनी, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी</u> सूचना केली की जर आपण शास्त्रीय अभ्यास केलेला आहे, तर हवेच्या दिशांनुसार ती गावे कोणती आहेत हे उपस्थितांना सांगण्यात यावे. प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की माळकुप, भाळवणी, हिवरे-कोरडा, भांडगाव ही गावे आहेत. या १-२ कि.मी. अंतरावरील गावांमध्ये संभाव्य वाढीची शक्यता आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे सांगितले की जिल्ह्यातील कार्यरत प्रकल्पांची अद्ययावत माहिती अहवालात नमुद केलेली नाही.

५) <u>अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती</u> पर्यावरण सल्लागार यांनी अभ्यास हा नीट केलेला दिसत नाही, अहवालातील माहिती ही अद्ययावत नाही, तरी अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात अद्ययावत माहिती द्यावी.

६) <u>सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी</u>

यांनी सांगितले अहवालात कोल क्रशर्सचा उल्लेख नाही. ईएसपी हा प्रदूषणचा स्रोत नाही. तर कोल क्रशर्स कोळसा हातळणी प्रकल्पात आहेत. तेथे कोणती प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा लावणार हे दिलेले नाही. त्याचप्रमाणे स्टीम प्रेस करताना आवाजाचा प्रश्न येतो. याचा उल्लेख येथे करणे उचित राहिल. पर्यावरणावर आघात होऊ शकतो, त्यामुळे कोणाकोणाला त्रास/आघात होऊ शकतो, याचा उल्लेख अहवालात असणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे गुगलवर गेल्यावर हवा गुणवत्ता अनुक्रमणिका ( Air Quality Index) येते. ज्या दिवशी Air Quality Index खराब असेल, त्यावेळेस आपण एखाद्या व्यक्तीस त्याला होणारे दुष्परिणाम आगाऊ कळवू शकतो. नुसते आकृती

काढून उपयोग नाही, तर लोकांना प्रकल्पामुळे किती आघात होईल व त्यांना काय त्रास होईल... आगाऊ समजणे महत्वाचे आहे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे मत मांडले की ...मी प्रकल्पाविरुध्द नाही. व्ही.एस.आय. ही शासकीय यंत्रणा आहे. तरी सर्व शास्त्रीय मुद्द्यांचे निराकरण आणि सर्व अद्ययावत माहिती माननीय अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या आदेशानुसार अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात करण्यात यावी. प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी याबाबत आश्वासन दिले.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत काही पर्यावरणीय सूचना, टीकाटिप्पणी वा आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्याची सूचना केली.

७) <u>श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, अध्यक्ष, धरित्री पर्यावरण परिरक्षण संस्था, जिल्हा - नालगोंडा, तेलंगणा राज्य:-</u>

श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी यांनी सांगितले की ते भारतातील सर्वात प्रथम असा पर्यावरणवादी आहेत की जो औद्योगिक विकासाचा आग्रह करत असतो. त्यांनी नविन आसवणी प्रकल्प स्थापनेबद्दल प्रकल्प प्रवर्तकांचे अभिनंदन केले. भारतात बेकारी हेच मोठे प्रदूषण आहे. स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारताची लोकसंख्या ३५ कोटींची होती. आता १३५ कोटी आहे. यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी भाषण न देता फक्त मुद्दे मांडण्याची सूचना केली. श्री रेड्डी यांनी पुढे सांगितले की पर्यावरण सल्लागार यांनी जल, हवा व आवाजाच्या प्रदूषणाचे सर्वेषण केलेले आहे. त्यांनी मागणी केली की प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघातील जनतेची आरोग्याची सद्यस्थिती, पीक उत्पादनाची सद्यस्थिती व भूगर्भातील पाण्याची सद्यस्थिती याचा अहवाल तयार करण्याची सूचना केली.

त्यांनी सांगितले की प्रकल्पात २४ एकर जमिन आहे. येथे पावसाचे पाणी साठवणूक (रेन वॉटर हार्वेस्टींग) अंमलात आणावे. पावसाचे पाणी साठवण्यासाठी मोठी साठवण टाकी बांधण्याची मागणी केली व पावसाळा संपल्यानंतर त्या साठवण टाकीतीलच पाणी वापरण्याची सूचना केली. त्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी उंचावेल. प्रकल्पात हरितपट्टा विकसित करताना फळझाडे व

औषधी वनस्पती मोठ्या प्रमाणात लावण्यात यावीत. त्याचप्रमाणे जवळील गावात हरितपट्टा विकसनाचा कार्यक्रम राबविण्यात यावा. त्याचप्रमाणे रस्त्याच्या दोन्ही बाजूस हरितपट्टा विकसित करण्यात यावा. स्थानिक युवक युवतींसाठी कौशल्यविकास कार्यक्रम राबविण्यात यावा. प्रकल्पात स्थानिक युवक युवतींना रोजगारात प्राधान्य देण्यात यावे.

श्री सुनंदा रेड्डी यांनी प्रकल्प प्रवर्तकांचे प्रकल्प उभारणीबाबत अभिनंदन केले व पर्यावरण सल्लागार यांचे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाबाबत अभिनंदन केले. श्री रेड्डी यांनी पर्यावरणविषयक जाहिल जनसुनावणी समितीस भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयास सदरहू प्रकल्पास त्वरित मंजूरी करण्याची शिफारस करण्याची विनंती केली.

त्यांनी त्यांचे निवेदन लेखी स्वरुपातही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस सादर केले.

पर्यावरण सल्लागार यांनी श्री रेड्डी यांचे आभार मानताना सांगितले की आपण केलेल्या हरित पट्टा विकसाच्या ब-याच सूचना अंमलबजावणीबाबत अहवालात अगोदरच अभिवचन देण्यात आलेले आहे.

८) **श्री संतोष चौधरी, ढवळपुरी, रानमळा वस्ती, तालुका-पारनेर, जिल्हा-अहमदनगरः-**

आम्ही प्रकल्प परिसरात वॉटरशेड संस्था ट्रस्टतर्फे काही पर्यावरणीय प्रकल्प राबवित आहोत. मृद संधारण (सॉईल प्रोटेक्शन व रिहॅबिलेटेशन) चा एक प्रकल्प चालू आहे. त्याचप्रमाणे आम्ही वॉटर शेडचे बरेच ट्रिटमेंट केलेले आहेत. आता सादरीकरणातील मुद्द्यांबाबत स्पष्टीकरण विचारत आहे.

आपण भूगर्भातील पाण्याबाबत अभ्यास केलेला आहे. प्रस्तावित प्रकल्पात स्पेंट वॉश व स्पेंट लीझ निर्माण होणार आहे. स्पेंट लिझ भूगर्भात मिसळून संभाव्य भूगर्भातील पाण्याचे आघात/प्रदूषण टाळण्यासाठी काय उपाययोजना करणार आहात त्याचा सादरीकरणात कुठेही उल्लेख नाही. शिवाय त्याच्यात रेन वॉटर जर एकत्रित झाले, तर निश्चितच ते भूगर्भातील पाणी प्रदूषित होऊ शकते.

त्याचप्रमाणे सादरीकरणात जल व हवा प्रदूषणाचा उल्लेख आहे. मात्र प्रकल्प उत्पादनामुळे परिसरात संभाव्य वासाच्या दुर्गंधीचा (Smell Nuisance) त्रास होईल त्यावर काही उपाययोजना

सादरीकरणात सांगितलेल्या नाहित. कारण आपल्या उत्पादनात मोलॅसिस हाच प्रमुख कच्चा माल आहे. त्याचा प्रचंड वास येतो. परिसरातील लोकांना त्याचा त्रास व त्यावर उपाययोजना याबाबत सादरीकरणात काहीही उल्लेख नाही.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** पर्यावरण सल्लागार यांना सामान्य लोकांच्या भाषेत वासाचा त्रास प्रकल्पाजवळील लोकांना होईल काय व त्यावर काय उपाययोजना करणार याबाबत माहिती देण्याची सूचना केली.

**आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** येथे सांगितले की रेन वॉटर स्पेंट लीझमध्ये एकत्रीत होऊन भूगर्भातील पाण्याचे प्रदूषण होणार काय व ते भूगर्भातील पाण्याचे प्रदूषण टाळण्यासाठी काय उपाययोजना करणार त्याची उपस्थितांना माहिती देण्यात यावी.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की स्पेंट वॉशबाबत सीआरईपी निर्देश पाळण्यात येतील. याबाबत सादरीकरणात सविस्तर माहिती दिलेली आहे.

स्पेंटलीझचा सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणेत (ईटीपी) प्रक्रिया करुन त्याचा प्रकल्पातच पुनर्वापर करणार आहोत. उत्पादनप्रक्रियेतील एकही सांडपाण्याचा थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही. त्यांनी सांगितले रेन वॉटर हार्व्हेस्टींग लाईन्स किंवा स्टॉर्म वॉटर लाईन्स व ईटीपी लाईन्स ह्या वेगवेगळ्या असतात. त्याबाबतचे सर्व निर्देश पाळण्यात येणार आहेत. त्यामुळे स्पेंट लीझमुळे संभाव्य भूगर्भातील पाण्याचे प्रदूषण होणार नाही.

आता वासाच्या त्रासाबाबत (smell nuisance) उपाययोजना म्हणजे मोलॅसिस साठवणुकीचे निर्देश व स्पेंट वॉश क्षमता साठवणीचे निर्देश तंतोतत पाळण्यात येतील. साठवणुकीचे ५ -७ दिवसांचे निर्देश आहेत. साठवणीमुळे वास येतो. तर तो येऊ नये म्हणून सर्व निर्देश पूर्णपणे पाळण्यात येतील.

९) यावेळी श्री संतोष चोधरी यांनी वासाच्या त्रासाबाबत काही निर्देश आहेत काय याबाबत विचारणा केली. पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की पूर्वी असे निर्देश होते की कच्चा पीटमध्ये मोलॅसिस व स्पेंट वॉश साठवणूक करणे, आता नविन निर्देशांनुसार पालन करण्यात येईल.

१०) यावेळी **आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** सांगितले की त्यांनी जो पाण्याबाबत प्रश्न उपस्थित केलेला आहे, त्या प्रश्नाला उत्तर स्ट्रॉम वॉटर ड्रेन वेगळी करावीत, स्पेंट वॉश/लिझ हे बंद पाईपमधूनच प्रक्रियेसाठी नेण्यात यावे, जेणेकरुन पावसाचे पाणी स्पेंट

वॉशमध्ये एकत्रित होणार नाही. म्हणजे स्पेंट वॉश वाहून नेणारी पाईपलाईन ही बंद असलेली पाहिजे. तीच तुम्ही उभारायची. स्टॉर्म वॉटरची वेगळी साठवण करण्यात यावी, कुठल्याही परिस्थितीत स्टॉर्म वॉटर हे स्पेंट वॉशमध्ये एकत्रित होता कामा नये.

दुसरा मुद्दा वासाचा आहे. वास हा सर्व आसवणी प्रकल्पातून येतो. त्यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे. स्पेंट वॉश वाहून नेणारी पाईपलाईन्स बंद असली व स्पेंट वॉश साठवणुक बंद असेल, तर आपण वासाचा त्रास निश्चितच कमी करु शकतो हीच कारखान्याकडून अपेक्षा आहे. आपण ज्या ज्या उपाययोजना करु शकतात त्या कराव्यात. सभोवताली जर दाट हरितपट्टा आवरण विकसित केले, तर ते वास निश्चितपणे नियंत्रित करु शकते. ही अपेक्षा उपस्थितांना आहे. तरी प्रकल्प सल्लागार यांनी आपण काय उपाययोजना करणार ते सांगा.

११) **यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** येथे मत मांडले की उपस्थित मुद्दा रास्त आहे. त्यांना सांगितले की भारतात वासाच्या पातळीचे निर्देश (Odour Nuisance Norms) नाहीत. जे USEPA मध्ये आहेत. याचा अर्थ असा नाही की आपण वासाच्या त्रासाचे नियंत्रण करु नये. आपल्याला वासाचे नियंत्रण करता येते. पूर्वी लगुन तंत्रज्ञान (Lagoon Technology) होते. त्यावेळी एमईई तंत्रज्ञान (Multi Effective Technology) नव्हते. या प्रकल्पात आहे. आता मळी स्टील टँकमध्ये साठवणूक करण्यात येते. तरीही त्या पदार्थाचा गुणधर्म आहे की त्याचा वास येतो, त्याच्यापासून अल्कोहोल बनवले जाते. भारतात अजून Odour Nuisance Norms नाहीत. त्यासाठी बंद साठवणूक किंवा बाष्पीभवन हा उपाय आहे. पूर्वी त्या नव्हत्या. आता ह्या प्रकल्पात एमईई तंत्रज्ञान (Multi Effective Technology), शून्य द्रव निःस्सारण (झिरो लिक्विड डिस्चार्ज) तंत्रज्ञान आहे. त्यामुळे प्रकिया केलेले सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही असे निर्देश टीओआरमध्ये आहेत. ते पाळण्याचे प्रकल्प प्रवर्तकांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

**आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** मत मांडले की पूर्वीच्या आसवणी प्रकल्पात जो वासाचा त्रास होता, तर आता प्रमाण कमी होईल. तरीही त्या पदार्थाचा तो गुणधर्म असल्याने वास जाणवणार.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की पूर्वी मोकळ्या लगुन्समध्ये स्पेंट वॉश साठवणूक होती. आता ती परवानगी नाही.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी ह्या मुद्द्यांवर आदेश दिले की प्रकल्प प्रवर्तकांना प्रकल्पात वासावर नियंत्रण आणण्यासाठी सर्व उपाय योजणे बंधनकारक राहिल. यावर झालेल्या चर्चेनुसार हरितपट्टा विकसित करणे, मोलॅसिस बंद टाकीत साठवणे व इतर सर्व उपाय योजण्यात यावेत. परिसरात अगदी कमीतकमी त्रास होईल अशा सर्व उपाययोजना राबविण्यात याव्यात असे आदेश अध्यक्षांनी दिले.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना लेखीस्वरुपातही सूचना आक्षेप नोंदवू शकता याबाबत माहिती दिली.

१२) **श्री वाय. चन्नकेशन रेड्डी, पर्यावरण व सामाजिक कार्यकर्ता, तेलंगणा:-**

त्यांनी सूचना केली की सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा ही २४X७ कार्यान्वित करण्यात यावी. सांडपाणी नियंत्रण सयंत्रणेस वेगळे मीटर लावण्यात यावे. सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा किती क्षमतेची उभारण्यात येईल, आहे, याबाबत स्पष्टीकरण आवश्यक होते. नाहीतर भूगर्भातील पाण्याचे प्रदूषण होईल. प्रकल्पामुळे बाधित गावांमध्ये कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी निधीतून सामाजिक कामे हाती घेण्यात यावी. हरित पट्टा विकसित करताना केळ्यांची झाडे लावल्यास त्यांना रोजगार व उत्पन्न मिळेल. प्रकल्पात रोजगार निर्मितीत बाधित गावांतील तरुण तरुणींना रोजगारात प्राधान्य देण्यात यावे. त्याचप्रमाणे कंत्राटी कामगार नियुक्त करताना बाधित गावातील लोकांनाच प्राधान्य देण्यात यावे.

माझी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस विनंती आहे की प्रकल्प मान्यतेची शिफारस केंद्र शासनास करण्यात यावी. त्यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर केले.

१३) **श्री सुदर्शन, पर्यावरणवादी, तेलंगणा:-**

त्यांनी प्रकल्पास समर्थन देताना काही सूचना केल्या की पर्यावरणास हानी न होता प्रकल्प कार्यान्वित करण्यात यावा. स्थानिकांना नोकरीत प्राधान्य द्यावे. सीएसआर निधी ही स्थानिकांच्या कौशल्यविकासासाठी खर्च करण्यात यावा. कंपनीत बालकामगारांची नियुक्ती करण्यात येऊ नये. प्रकल्पास धन्यावाद. त्यांनी त्यांचे निवेदन लेखी स्वरुपातही सादर केले.

१४) **डॉ. राजेश भनगडे, सरपंच, ढवळपुरी ग्रामपंचायत, तालुका- पारनेर, जिल्हा- अहमदनगर:-**

प्रकल्प उभारणीचे नियोजनाच्यावेळी प्रकल्प प्रवर्तकांशी चर्चा करताना दोन्ही मुद्दे उपस्थित केलेले होते. प्रथम वासाचा त्रासाबाबत. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तकांनी जुन्या आसवणी प्रकल्पासारखा त्रास होणार नाही असे सांगितले. दुसरा मुद्दा सांडपाण्याचा होता. त्यावेळीच त्यांनी प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण असेल अशी ग्वाही दिली. तरी कारखान्याचा शेतक-यांना, परिसरातील नागरिकांना त्रास होऊ नये याची खबरदारी कारखाना प्रशासनाने घ्यावी. त्याचप्रमाणे जो सीएसआर निधीचा उल्लेख सादरीकरणात करण्यात आला. तो फक्त पेपरवर राहू नये. सीएसआर निधी खर्च करताना प्रकल्पामुळे जी बाधित होणारी दोन गावे माळकुप व ढवळपुरी यांचा प्राधान्य देण्यात यावे ही विनंती. त्याचप्रमाणे शेतक-यांच्या विचार करताना एक गोष्ट लक्षात घ्यावी की शेतक-यांना फक्त उसालाच हमी भाव मिळतो. इतर पीकांना मिळत नाही. तरी ज्या शेतक-यांना पाण्याची उपलब्धता आहे, जे शेतकरी ऊसपीकाचे उत्पादन करतील, त्यांना मार्गदर्शन करावे. येथील शेतक-यांना कांदे, गहु, ज्वारी पीक उत्पादन कसे करावे हे माहित आहे. पण ऊसपीक उत्पादनाबाबत नाही. तरी ऊस उत्पादनासाठी स्थानिक शेतक-यांना मार्गदर्शन करण्यासाठी कारखान्याने सहकार्य करावे. त्यामुळे ऊसपीकास भाव मिळाल्यावर त्याला स्थैर्य प्राप्त होईल.

त्यांनी पुढे विचारणा केली की जी प्रदूषणाची पातळी सांगण्यात आली, त्याची देखरेख (Monitoring) ही वार्षिक होते काय याची माहिती द्यावी व त्याची माहिती ग्रामपंचायतीस देत जावी. जेणेकरुन ती माहिती ग्रामस्थांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की शासनाने परिक्षण कार्यक्रम आखून दिलेला आहे. तो पाळण्यात येतो व त्याचा अहवाल हा कारखानाच्या गेटवर लावण्यात येतो.

डॉ. भनगडे यांनी उत्तर दिले की ग्रामसभेत कारखाना निकष पाळतो वा नाही याबाबत चर्चा होते व ते कारखाना व ग्रामस्थ यांच्या संबंधांसाठी योग्य आहे. तरी त्याचे पालन कारखान्याने करावे. त्यांनी दुष्काळी भागाचा चेहरामोहरा बदलण्याच्या प्रयत्नांबद्दल आभार मानले.

अध्यक्षांनी चर्चेचा गोषवारा करताना दोन-तीन मुद्दे मांडले. ते खालीलप्रमाणे-

१) डॉ. राजेश बनगडे, सरपंच, ढवळपुरी यांनी सांगितल्याप्रमाणे कारखाना कार्यान्वित झाल्यावर पर्यावरण विभागाने पाळण्यास सांगितलेले निकष ग्रामपंचायत कार्यालयास वेळोवेळी कळवावेत,

२) त्याचप्रमाणे प्रदूषण पातळीचा इलेक्ट्रॉनिक बोर्ड लावण्यात यावा, जेणेकरुन नागरिकांना प्रदूषण पातळी समजेल. ग्रामसभेच्यावेळी त्याचा अहवाल उपलब्ध करुन देण्यात यावा. त्याची अंमलबजावणी तंतोतंत करण्यात यावी,

३) प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्याचे जे जे आश्वासन देण्यात आलेले आहे, त्याची १००% अंमलबजावणी झाली पाहिजे,

४) कारखान्याच्या गेटवर एक सूचना पेटी कायमची ठेवण्यात यावी. जरी आता ऑनलाईन फोरम उपलब्ध आहेत, तरीही सर्वसामान्य शेतकरी, नागरिक यांना ते करणे अडचणीचे होऊ शकते, त्याबाबत माहित नसेल, त्याला सहजपणे त्याची तक्रार, सूचना नोंदविण्यासाठी व्यवस्था उपलब्ध असणे गरजेचे आहे. ज्यावेळी कारखान्याच्या सभासदांची मासिक बैठक असेल, त्यावेळी प्राप्त लेखी सूचनांबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी चर्चेचा समारोप करताना सांगितले की उपस्थितांना रास्त प्रश्न, सूचना उपस्थित केलेल्या आहेत. उपस्थितांनी दोन्ही बाजूंचा विचार केलेला आहे. उद्योग आल्याने काहींना प्रत्यक्ष तर काहींना अप्रत्यक्ष रोजगार मिळणार आहे. त्याचप्रमाणे कारखाना प्रशासनानेदेखील योग्य भूमिका वेळोवेळी घेतली पाहिजे. सीएसआर निधीबाबत डॉ. भनगडे यांनी रास्त मुद्दा उपस्थित केला. प्रकल्पामुळे जी गावे बाधित होणार आहेत, तेथे सीएसआर निधी जास्त प्रमाणात खर्च करण्यात यावा. त्यात जल संवर्धनाची कामे (Water Conservation) प्राधान्याने घेण्यात यावी.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याची इतिवृतात समावेश करण्यात येईल. सदरहू इतिवृत्त मराठी व इंग्रजीत, प्राप्त झालेल्या लेखी सूचना, आक्षेप व अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल. त्यांनी बैठकीत रास्त सूचना उपस्थित केल्याबद्दल बैठकीचा अध्यक्ष या नात्याने उपस्थितांचे आभार मानले.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की बैठकीत अध्यक्षांनी केलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन प्रकल्प प्रवर्तकांनी करावे असे निर्देश देण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे पर्यावरण सल्लागार यांनाही बैठकीत करण्यात आलेल्या

सूचनांचा अंतर्भाव अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करताना करण्याचे निर्देश दिले. त्यांनी बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल सर्व स्थानिकांचे, पर्यावरण प्रेमी, पत्रकार, कारखाना प्रशासनाचे आभार मानले व अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

प्राप्त झालेल्या सूचना / आक्षेप सोबत जोडण्यात आलेल्या आहेत.

(संजीव रेदासनी)
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्र. उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, अहमदनगर

( डॉ. पी. एम. जोशी, )
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्र. प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, नाशिक

(संदिप निचित )
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी – अहमदनगर,
जिल्हा – अहमदनगर